


आमदार सुनील शेळके यांचा "जनसंवाद" अभियान दौरा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्षे 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 10/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 214 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# लोकशाहीत पत्रकार आणि राज्यकर्ते हे शत्रू नसून हितचिंतक

## मुख्यमंत्री

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई - "पत्रकार आणि राज्यकर्ते हे एकमेकांचे शत्रू नसून लोकशाहीचे खरे हितचिंतक आहेत. समाजासमोर सत्याचे सर्व पैलू मांडणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे, तर पत्रकारांना योग्य पाठबळ देणे हे राज्यकर्त्यांचे पहिले कर्तव्य आहे," असा ठाम संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. मराठी पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आलेला फिनिक्स पुरस्कार स्वीकारताना ते मुंबईत बोलत होते. मुंबईतील यशवंतराव चव्हाण हॉलमध्ये हा भव्य सोहळा पार पडला. या वेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, राज्याचे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, एबीपी माझा चॅनेलच्या कार्यकारी संपादक सरिता कौशिक, सकाळ माध्यम समूहाचे संपादक निलेश खरे, लोकमत मुंबई आवृत्तीचे संपादक विजय बाविस्कर, पुढारीचे संपादक विवेक गिरधारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "लोकशाही मजबूत ठेवायची असेल तर राज्यकर्त्यांनी टीकेला घाबरता कामा नये. टीकेसोबत सत्याची दुसरी बाजूही पत्रकारांनी निडरपणे मांडली पाहिजे.""पत्रकारितेमुळे राज्यकर्त्यांना दिशादर्शन मिळते. म्हणूनच पत्रकारांना आधार देणे हे कोणत्याही सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे." "विरोधकांना जेव्हा वाटत होते की, मी राजकारणात संपलो आहे, तेव्हा मी सकारात्मकतेने काम करत राहिलो. त्यातूनच मला पुन्हा संधी मिळाली आणि भरारी घेता आली."

"हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे कारण तो माझ्या कामगिरीपेक्षा लोकांच्या विश्वासाचा सन्मान आहे."

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री श्री रविशंकर म्हणाले, "टीका आणि प्रशंसेचा समतोल साधणारा माणूसच जगाच्या कौतुकास पात्र ठरतो. देवेंद्र फडणवीस यांना हा पुरस्कार देऊन मराठी पत्रकार संघाने योग्य व्यक्तीची निवड केली आहे. परंतु पुढील वर्षी हा पुरस्कार देताना पत्रकार संघाचा कस लागणार आहे, कारण फडणवीस यांना सन्मान देऊन त्यांनीच एक उच्च मापदंड निर्माण केला आहे."

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशीयांनी प्रास्ताविक करून पत्रकार संघाची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या विशेष व्हिडिओ बुकचे प्रकाशन झाले. विविध मान्यवरांचे मनोगतही व्हिडिओ संदेशाद्वारे प्रदर्शित करण्यात आले.

जलपूजनाने कार्यक्रमाची सुरूवात

देशातील प्रमुख ११ नद्यांच्या पाण्यांनी भरलेल्या जलकुंभांचे श्री श्री रविशंकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते पूजन करून नदी व पर्यावरण रक्षणाचा संदेश देत आगळ्या-वेगळ्या पद्धतीने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

मराठी पत्रकार संघाचे संघटक संदीप पारोळेकर, सचिव हरीभाऊ प्रक्षाळे, विवेक इनामदार, डॉ. शिबू नायर, अनिल माने, पंकज बिबवे यांच्यासह पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप चव्हाण यांनी केले.

# पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती द्या

## अजित पवार

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यातील सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणांनी सुसज्ज रस्ते, सोयी – सुविधा असणारे म्हाडाचे लेआउट मंजूर करून त्यानुसार प्रकरणपरत्वे एकल किंवा समूह पुनर्विकास करावा,असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध विषयांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या कामांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सविस्तर आढावा घेतला. प्रधानमंत्री आवास योजना २.० ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. परवडणाऱ्या दरात सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून द्यावीत. मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या धर्तीवर बांधकामाचा दर्जा उत्तम ठेवून प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.नेरे, रोहकल, शिरूर बाबत जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील नेरे, खेड तालुक्यातील रोहकल येथे प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच शिरूर तालुक्यात म्हाडाच्या जागेमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पातील अडथळे दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.खराडी, पुणे येथील म्हाडा अभिन्यासातील पोस्ट ऑफिस आरक्षण रद्द करणे, लोणावळा नगरपरिषद हद्दीतील म्हाडाच्या मालकीच्या जागांवर पुनर्विकास व नवीन बांधकाम इत्यादी विषयांवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली. दापोडी येथील अशोक गृहनिर्माण संस्थेमधील पात्र सदस्यांना तेथील म्हाडाच्या २० टक्के आरक्षणानुसार सोडत न काढता योजनेत समाविष्ट करून घ्यावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या बैठकीस पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकास (१) व गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता,नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे,म्हाडा पुणे चे मुख्याधिकारी राहुल साकोरे उपस्थित होते तर पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम हे दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे उपस्थित होते

# जिल्हा डॉजबॉल स्पर्धेत एच. ए. स्कूलचा डंका; दोन विजेतेपदावर नाव कोरलं

## पिंपरीत जिल्हा डॉजबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा डॉजबॉल स्पर्धा नुकतीच एच. ए. स्कूल पिंपरी येथे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे व उपायुक्त पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सुजाता कोरके, आशा माने तसेच क्रीडाधिकारी रंगराव कारंडे यांनी उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे प्रास्ताविक क्रीडा समन्वयक कन्हेरे यांनी केले, तर क्रीडाशिक्षक मुकेश पवार, हनुमंत सुतार व शिवाजी मुटकुळे यांनी संपूर्ण कामकाज पाहिले. पंच म्हणून पिंपरी चिंचवड डॉजबॉल संघटना व पुणे जिल्हा डॉजबॉल संघटनेचे सचिव रामेश्वर हराळे व त्यांच्या टीमने काम पाहिले. स्पर्धेत खेळाडूंनी दमदार खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली.स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे:१७ वर्षे मुलगे गटात एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण १०) यांनी शिक्षण प्रसारक मंडळी मराठी माध्यम, निगडी (गुण ४) यांचा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला. तृतीय स्थानावर सावित्रीबाई फुले शाळा, मोशी (गुण ५) तर चौथ्या स्थानावर एम.एम.विद्यामंदिर,काळेवाडी (गुण ३) राहिले.१७ वर्षे मुली गटात एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण १६) यांनी विद्यानंद भवन स्कूल, निगडी (गुण ०) यांचा पराभव करून विजेतेपद मिळवले. तृतीय स्थान सेंट पीटर स्कूल (गुण ५) यांनी मिळवले तर पीसीएमसी पिंपळे गुरव विद्यालय (गुण २) चौथ्या स्थानावर राहिले.१९ वर्षे मुली गटात शिक्षण प्रसारक मंडळी मराठी माध्यम, निगडी (गुण ६) यांनी एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण २) यांचा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला.

तृतीय स्थान एम.एम.विद्यालय व ज्युनिअर कॉलेज,काळेवाडी (गुण ९) यांनी मिळवले तर सेंट उर्सुला हायस्कूल, निगडी (गुण १) चौथ्या स्थानावर राहिले.या स्पर्धेत एच. ए. स्कूल, पिंपरीने उत्कृष्ट कामगिरी करत एकूण दोन विजेतेपद पटकावून आपला डंका वाजवला.

स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांचे विशेष अभिनंदन करण्यात आले असून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचे नेहरुनगरमध्ये मोफत महाआरोग्य शिबिर



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे नेहरूनगर येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३०० हून अधिक नागरिकांनी वैद्यकीय सेवा व विविध तपासण्यांचा लाभ घेतला.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उद्घाटन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, नोडल ऑफिसर डॉ. छाया शिंदे, डॉ. गोविंद नरके, पीएचएन यशस्विता बाणखेले तसेच वायसीएम हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर, आशा सेविका, परिचारिका उपस्थित होते.शिबिराचे आयोजन यशवंतराव चव्हाण स्मृती हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले होते.

या शिबिरात नागरिकांसाठी रक्त तपासणी, लसीकरण, एक्स-रे, गरोदर मातांची तपासणी, आभा व आयुष्मान कार्ड नोंदणी अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, दंतरोग, नाक-कान-घसा तज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाचा लाभ नागरिकांना घेता आला.

सर्व तपासण्यांसोबत आवश्यक औषधांचे मोफत वितरणही करण्यात आले

# एआय मुळे अध्यापन अधिक परिणामकारक - डॉ. अमेय पांगारकर

## एसबीपीआयएम मध्ये "एआय फॉर टीचर्स" प्रशिक्षण कार्यशाळा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : 'एआय'चा उपयोग करून अवघड आणि अती क्लिष्ट विषयाचे सहज, सुलभ विश्लेषण करणे शक्य आहे. विविध प्रकारचे टूल वापरून अभियांत्रिकीशिवाय इतर अभ्यासक्रमातही शिक्षकांनी याचा वापर केला पाहिजे. पुढील काळात एआय मुळे अध्यापन अधिक परिणामकारक होईल असे मत 'ए कन्सल्टन्सी'चे सहसंस्थापक डॉ. अमेय पांगारकर यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ




मॅनेजमेंटच्या कर्मचारी विकास समितीच्या वतीने "एआय फॉर टीचर्स" या विषयावर प्राध्यापकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवडकर, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. काजल महेश्वरी, डॉ. अमरीश पद्मा, डॉ. हीना आदींसह एमबीए चे सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

अध्यापन पद्धती अधिक परिणामकारक व आकर्षक करण्यासाठी एआयचा वापर कसा करता येईल, याचे व्यवहार्य मार्गदर्शन शिक्षकांना मिळाले पाहिजे. यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

यामुळे प्राध्यापकांना शैक्षणिक कार्यात नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची प्रेरणा मिळेल. अध्यापन प्रक्रियेत अधिक गुणवत्ता व नाविन्य आणण्यास हा कार्यक्रम उपयुक्त ठरेल असे एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवडकर यांनी सांगितले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी निर्माल्य संकलन उपक्रम यशस्वी!

## पिंपरी चिंचवड शहरातून 256 टनांहून अधिक निर्माल्याचे संकलन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गणेशोत्सव काळात पिंपरी चिंचवड शहरात राबविण्यात आलेल्या निर्माल्य संकलन मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

या उपक्रमांतर्गत २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२५ या कालावधीत एकूण २५६.१७ टन निर्माल्याचे संकलन करण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे नदी, नाले व तलावात निर्माल्य टाकण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले असून जलप्रदूषण नियंत्रणात ठेवण्यास मदत झाली आहे.महापालिका आयुक्त तथा




प्रशासक शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून गणेशोत्सव काळात निर्माल्य संकलनाची प्रभावी व्यवस्था करण्यात आली होती.

गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमांतर्गत संकलित झालेल्या निर्माल्याचा पर्यावरणपूरक पद्धतीने पुनर्वापर करून त्याद्वारे खत निर्मिती करण्यात येणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 10/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# युवा धोरण समितीवर निमंत्रित सदस्य म्हणून आमदार अमित गोरखे !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : राज्याच्या युवा धोरणाच्या आराखड्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीवर पिंपरी-चिंचवडचे युवा आमदार अमित गोरखे यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

"ही समिती मा. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करते." मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे युवा पिढीच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल.

युवकांचे शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, उद्योजकता, क्रीडा, कला, संस्कृती आणि सामाजिक सहभाग यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर हे धोरण लक्ष केंद्रित करणार आहे. युवकांना योग्य संधी उपलब्ध करून देणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ देणारे दूरदृष्टीचे धोरण तयार करणे हा या समितीचा मुख्य उद्देश आहे.यापूर्वीही पिंपरी -चिंचवडचे विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांची प्रतिष्ठित इंडो-चायना युथ फेस्टिवल ,चायना मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली होती. देशातून एका प्रतिनिधीला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत असते. याआधीही त्यांच्या अतुलनीय सामाजिक व सार्वजनिक कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

२०११-२०१२ मध्ये केंद्र सरकारचा राष्ट्रीय युवा पुरस्कार तसेच शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्य सरकार कडून शिक्षण रत्न पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत.या नियुक्तीमुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण राज्यातील युवा वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

विविध स्तरांतून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांचे कार्य युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या नव्या जबाबदारीबद्दल बोलताना आमदार गोरखे म्हणाले, "राज्यातील युवक हेच आपल्या राज्याचे आणि देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या क्षमतांना वाव देऊन, आकांक्षांना न्याय देणारे धोरण तयार करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. आमचे नेते माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. या समितीच्या माध्यमातून मी ग्रामीण तसेच शहरी भागातील युवकांच्या गरजा आणि अपेक्षा प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करेन."आमदार गोरखे यांच्या या नियुक्तीमुळे त्यांच्या योगदानातून युवा धोरणाला एक नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून, विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# आमदार सुनील शेळके यांचा "जनसंवाद" अभियान दौरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मावळ : टाकवे- मावळ तालुक्यातील प्रत्येक नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी आमदार सुनील आण्णा शेळके यांनी हाती घेतलेल्या "जनसंवाद" अभियानाचा पुढचा टप्पा टाकवे बु. ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत टाकवे बु., फळणे, बेलज, राजपुरी व भोयरे पाथरगाव या गावांमध्ये पार पडला.

या कार्यक्रमात स्थानिक ग्रामस्थांनी आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी व मागण्या आमदारांसमोर स्पष्टपणे मांडल्या. पाणीपुरवठ्याची अडचण, मुख्य व अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था, वीज समस्यांबाबत तक्रारी, रेशनकार्डच्या गैरसोयी, एस.टी. बसची अनियमितता, पाणंद रस्ते खुले करण्याची मागणी यावर ग्रामस्थांनी भर दिला. त्याचबरोबर कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या जागेबाबत प्रस्ताव सादर करणे या मुद्द्यावर ठोस निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली.कार्यक्रमात महसूल, पंचायत समिती, विद्युत वितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, वनविभाग आदींचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सर्व तक्रारींची सखोल नोंद घेऊन संबंधित विभागांशी तातडीने चर्चा करून त्वरित कार्यवाही केली जाईल, असा विश्वास आमदार सुनील शेळके यांनी ग्रामस्थांना दिला.यावेळी आमदार सुनील शेळके म्हणाले, "जनसंवाद हा केवळ संवादाचा कार्यक्रम नसून तो लोकांच्या भावना समजून घेण्याचा, त्यांच्या अडचणींना गांभीर्याने ऐकून त्यावर तोडगा काढण्याचा एक खरा प्रयत्न आहे. तळेगाव, वडगाव येथील जनसंपर्क कार्यालयात नागरिक नियमितपणे भेट देतात, परंतु ज्या नागरिकांना तिथे पोहोचणे शक्य नाही अशा माता-माऊली व बांधवांच्या अडचणी मी त्यांच्या गावी जाऊन ऐकणार आहे. पुढील काही दिवसांत तालुक्यातील सर्व गावांमध्ये जाऊन थेट जनतेशी संवाद साधून विकासासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील."

मावळ तालुक्यातील लोकप्रतिनिधी म्हणून सुनील शेळके यांचे हे अभियान ही केवळ एक राजकीय उपक्रम नसून नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा आणि विकासाच्या वाटचालीला गती देण्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579